मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चिखलीतील आरक्षित भूखंड बनला 'अडगळ'

## स्थानिक नागरिकांमध्ये संताप; लोकप्रतिनिधींकडून प्रशासनाला पत्र व्यवहार

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नियोजनशून्य कारभाराचा फटका आता चिखलीतील उदयोन्मुख खेळाडूंना आणि स्थानिक रहिवाशांना बसू लागला आहे. पिंगळे रोडवरील इम्पेरियल हॉस्पिटल समोरील गट क्रमांक ११९३/७ हा भूखंड महापालिकेच्या विकास आराखड्यानुसार पार्किंगसाठी आरक्षित असला, तरी प्रत्यक्षात मात्र प्रशासनाने या जागेचा वापर अडगळीचे सामान टाकण्यासाठी सुरू केला आहे.





या ठिकाणी महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने राडारोडा, जुने फ्लेक्स आणि भंगार साहित्य टाकल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. चिखली परिसरात खेळासाठी हक्काचे एकही मैदान उपलब्ध नसताना, मुले ज्या जागेवर कबड्डी आणि इतर खेळांचा सराव करत होती, तिथे आता घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सभोवताली रहिवासी परिसर आहे. या मोकळ्या जागेत कचरा साचतो. पावसाळ्यात या परिसरात डासांचे प्रादुर्भाव वाढतो. दुर्गंधी पसरते. यामुळे नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न गंभीर बनतो. इतकेच नव्हे तर या कचऱ्याच्या ढिगाऱ्यात सापांचा वावर वाढल्यानचेही स्थानिक नागरिक सांगतात.

या गंभीर समस्येबाबत माजी नगरसेवक विकास साने, लोकप्रतिनिधी यश साने, संगीता नानी ताम्हाणे यांनी वारंवार महापालिका प्रशासनाशी पत्रव्यवहार करून प्रत्यक्ष संवाद साधला आहे. मात्र, प्रशासनाकडून याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आहे. "याबाबत तातडीने उपाययोजना राबवल्या जातील" असे पोकळ आश्वासन दिले होते, परंतु प्रत्यक्षात परिस्थिती 'जैसे थे' आहे. प्रशासनाच्या या आडमुठ्या धोरणामुळे चिखलीतील गुणवंत खेळाडूंना सरावापासून वंचित



राहावे लागत असून, एका आरक्षित भूखंडाचे रूपांतर डम्पिंग ग्राऊंडमध्ये झाल्याने स्थानिक रहिवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

> याबाबत लवकरात लवकर माहिती घेतली जाईल. आणि संबंधित समस्येवर तोडगा काढण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या जातील. नागरिकांची गैरसोय होऊ देणार नाही.
>
> **- श्रावण हर्डीकर, आयुक्त.**

> चिखली परिसरातील खेळाडूंसाठी ही जागा एकमेव आधार होती. पार्किंगचे आरक्षण विकसित होईपर्यंत किमान खेळाडूंना सरावासाठी ही जागा मोकळी ठेवणे प्रशासनाचे कर्तव्य आहे. मात्र, महापालिकेचा अतिक्रमण विभागच येथे कचरा आणि राडारोडा टाकून खेळाडूंच्या भवितव्याशी खेळत आहे. आम्ही वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासन सुस्त आहे. जर तातडीने हा भूखंड स्वच्छ केला नाही, तर आम्हाला खेळाडू आणि नागरिकांसह तीव्र आंदोलन छेडावे लागेल.
>
> **- विकास साने, नगरसेवक.**

> आरक्षित भूखंडाचा असा दुरुपयोग होणे हे प्रशासनाचे मोठे अपयश आहे. रहिवासी भागात कचरा आणि भंगार टाकल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून, तिथे साप निघण्याच्या घटना घडत आहेत. महापालिकेने हा राडारोडा त्वरित हटवून ही जागा खेळाडूंना पुन्हा उपलब्ध करून द्यावी. चिखलीतील एकाही मैदानाची सोय नसताना, उपलब्ध असलेल्या जागेवरही अतिक्रमण करणे हे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही.
>
> **- यश साने, नगरसेवक.**

# सुनेत्रा पवार यांची पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी नियुक्ती

## उपमुख्यमंत्री पदानंतर सुनेत्रा पवारांकडे अजित पवारांच्या आणखी दोन जबाबदाऱ्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बीड आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून नियुक्ती झाली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर या दोन जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी कुणाकडे जाणार? याची राजकीय चर्चा सुरू झाली होती. बीड आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा शासन निर्णय आज जारी करण्यात आला आहे. बीड आणि पुण्याचे पालकत्व आजपासून सुनेत्रा पवार यांच्याकडे राहणार आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारने आज एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत सुनेत्रा अजित पवार यांची पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या या जागांवर ही नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने आज (३ फेब्रुवारी २०२६) यासंदर्भातील शासन निर्णय (GR) जारी करण्यात आला आहे.



### सुनेत्रा पवारांकडे तीन खाती

» दरम्यान, अजित पवारांच्या अकाली निधनामुळे महाराष्ट्रावर शोककळा पसरली. तसंच, त्यांच्याकडे असलेली खातीही निराधार झाली. अजित पवार फक्त उपमुख्यमंत्री नव्हते, तर राज्यातील अनेक जबाबदाऱ्या सरकारने त्यांच्यावर सोपवल्या होत्या. त्यामुळे या जबाबदाऱ्या आता कोण सांभाळणार हा प्रश्न आहे. त्यामुळे त्यांचं उपमुख्यमंत्री पद त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवारांकडे देण्यात आलं. राज्याच्या ११ व्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा आणि युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास ही तीन खाती देण्यात आली आहेत. तर अजित पवारांचे नियोजन आणि वित्त हे खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे ठेवले आहे.

# अजितदादा खऱ्या अर्थाने पिंपरी-चिंचवडचे शिल्पकार

## मा. नगरसेविका कविता आल्हाट त्यांनी दिला दादांच्या आठवणींना उजाळा; डोळे पाणावले, कंठ दाटला



**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे लोकनेते तथा दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न येणारी आहे. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या वतीने आयोजित शोकसभेत माजी नगरसेविका कविता आल्हाट यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी बोलताना आल्हाट यांचा कंठ दाटून आला होता. "दादा समोर असताना एक वेगळी ऊर्जा मिळायची, पण आज त्यांच्याबद्दल शोक व्यक्त करताना पाय थरथरत आहेत आणि छातीत धडधड होत आहे," अशा शब्दांत त्यांनी आपल्या मनातील दुःख बोलून दाखवले.

कविता आल्हाट यांनी दादांच्या आठवणींना उजाळा देताना सांगितले की, "दादांनी केवळ राजकारणच नाही तर समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम केले. कबड्डी संघटनेत काम करत असताना दादांशी माझा जवळून संबंध आला. त्यांनी मला पुणे जिल्हा निरीक्षक आणि त्यानंतर शहराध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. आज मी जी काही कार्यकर्ती म्हणून उभी आहे, ती केवळ दादांमुळेच. दादांनी मला खेळाचे नियम, नीतिमत्ता आणि मूल्ये यांची शिकवण दिली. 'कोणाचे चांगले करता आले नाही तरी चालेल, पण कोणाचे वाईट करू नकोस,' हा त्यांचा मंत्र मी कायम स्मरणात ठेवला आहे."

त्या पुढे म्हणाल्या की, "दादांना पिंपरी-चिंचवडबद्दल विशेष आपुलकी होती. त्यांनी या शहराला स्वतःचे कुटुंब मानले होते. आपल्या हक्काच्या कुटुंबापेक्षाही जास्त वेळ त्यांनी या शहराच्या विकासासाठी दिला. त्यामुळेच दादा खऱ्या अर्थाने पिंपरी-चिंचवडचे शिल्पकार ठरले आहेत. आज दादा आपल्यात नाहीत, ही कल्पनाच मनाला चटका लावून जाणारी आहे. त्यांच्या जाण्याने सुनेत्रा वहिनी आणि संपूर्ण पवार कुटुंबावर जो दुखाचा डोंगर कोसळला आहे, त्यामध्ये आम्ही सर्व कार्यकर्ते त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. आपल्या डोळ्यातील अश्रू साठवून ठेवून, दादांच्या कुटुंबाला आधार देणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल." अशा भावूक शब्दांत कविता आल्हाट यांनी अजितदादांना अभिवादन केले.

# ‘काळा घोडा फेस्टिव्हल 2026’ मध्ये महापालिकेची शाळा प्रथम

## “मानवी विचारांचे रोलरकोस्टर” या विषयावरील इन्स्टॉलेशन ठरले लक्षवेधी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुंबई येथील प्रतिष्ठित काळा घोडा फेस्टिव्हल २०२६ अंतर्गत आयोजित चिल्ड्रन्स इन्स्टॉलेशन विभागासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चार शाळांची निवड झाली होती. या विभागातील विजेत्या शाळांची यादी नुकतीच जाहीर करण्यात आली असून त्यामध्ये महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण प्राथमिक कन्या शाळा, थेरगाव या शाळेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. या प्रतिष्ठित स्पर्धेत पहिल्यांदाच महापालिकेच्या शाळेला प्रथम पारितोषिक मिळाले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर तसेच कला नोडल अधिकारी श्रीकांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

थेरगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी “मानवी विचारांचे रोलरकोस्टर” या विषयावर सादर केलेले इन्स्टॉलेशन परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेणारे ठरले. टाकाऊ वस्तूंचा सर्जनशील वापर करून मानवी मनाचा वेग, भावनांची गुंतागुंत आणि आत्मसंयम यांचे प्रभावी प्रतीकात्मक दर्शन या मॉडेलमध्ये घडवण्यात आले आहे. हे मॉडेल सर्वोत्तम ठरले असून थेरगाव शाळेला प्रथम क्रमांक मिळाला आहे. या यशामुळे मनपा शाळांनी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रासह विविध राज्यांतील अनेक नामांकित व खासगी शाळांनी सहभाग नोंदवला होता. अशा स्पर्धात्मक वातावरणात महापालिकेच्या शाळेने मिळवलेले हे यश विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता, कल्पकता आणि मार्गदर्शनाची पावती देणारे ठरले आहे.

या इन्स्टॉलेशनची संकल्पना व निर्मिती कला शिक्षिका मुक्ता पुसाळकर-धोंगडे यांनी केली असून, त्यांना अंशकालीन शिक्षिका स्वाती मदने व दिपाली नवले यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमात सानिका पवार, श्रावणी महापुरे, दिपाली पांडगुळे, अनुजा टोमके, प्रिया होळकर, हुमेरा शेख, यशोदा राठोड, किशोरी वाबळे व समिक्षा डींगरे या विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवला. स्पर्धेमध्ये मिळालेल्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी दौंडकर यांच्यासह शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.



> “काळा घोडा फेस्टिव्हलसारख्या प्रतिष्ठित स्पर्धेत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळेला प्रथम पारितोषिक मिळणे ही ऐतिहासिक बाब आहे. विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंमधून साकारलेली कलाकृती ही त्यांच्या विचारक्षमतेची आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोनाची साक्ष देणारी आहे. महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना अशा संधी देत राहणार असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण विभाग सातत्याने प्रयत्नशील राहील.
>
> **- ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

### इन्स्टॉलेशनची कलात्मक मांडणी

» ‘मानवी विचारांचे रोलरकोस्टर’ या संकल्पनेवर आधारित इन्स्टॉलेशनची कलात्मक मांडणी, प्रतीकात्मकता आणि भावनिक आशयामुळे परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. यामध्ये सायकलच्या चाकांमध्ये धावणारा घोडा विचारांची ऊर्जा आणि इच्छाशक्ती दर्शवतो, तर दोरी पकडून उभी असलेली मुलगी आत्मसंयम आणि विवेकाचे प्रतीक ठरते. वेस्ट मटेरियलमधून घडवलेले चेहरे, मानवी आकृती आणि त्रिमितीय रचना जीवनातील संघर्ष, अनुभव आणि मानसिक चढ-उतार अधोरेखित करतात. विचारांवर नियंत्रण ठेवून अनुभवांना योग्य दिशा देण्याचा संदेश देणाऱ्या या इन्स्टॉलेशनमुळे विद्यार्थ्यांना स्पर्धेत मानांकन मिळाले असून, त्यांच्या सर्जनशीलतेने राष्ट्रीय स्तरावर कौतुकास पात्र ठरले आहे.

> “पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळवणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांची कल्पकता, मेहनत आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले आहे. महापालिकेच्या शाळांमधील गुणवत्ता आणि संधी योग्य दिशेने दिल्यास विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देखील सहज यश मिळवू शकतात, याचे हे उत्तम उदाहरण आहे.
>
> **- विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# पुण्याच्या महिला महापौरपदी मंजुषा नागपुरे

## उपमहापौरपदासाठी परशुराम वाडेकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या महापौरपदासाठी भाजपकडुन मंजुषा नागपुरे आणि उपमहापौरपदासाठी परशुराम वाडेकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. या दोन्ही पदासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार )आणि कॉंग्रेसने उमेदवारी अर्ज दाखल केले असले तरी पुणे महापालिकेत भाजपची एकहात्ती सत्ता असल्यामुळे या निवडणुकीत नागपुरे आणि वाडेकर यांचा विजय निश्चित आहे. त्यामुळे नागपुरे आणि वाडेकर यांच्या निवडीची केवळ औपचारीकता बाकी राहिली आहे.



पुणे महापालिकेच्या निवडणुकीत ११९ जागा मिळवून भाजपला निर्विवाद बहुमत मिळाले आहे. सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. भाजपच्या चौथ्यांदा निवडून आलेल्या वर्षा तापकीर यांच्यासह मंजुषा नागपुरे, रंजना टिळेकर, मानसी देशपांडे, स्वरादा बापट यांच्या नावाची जोरदार चर्चा होती. महापौर कोण होणार याची उत्सुकता लागली होती. महापौरपदासाठी मंगळवारी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मुदत होती. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी महापौरपदासाठी मंजुषा नागपुरे आणि उपमहापौरपदासाठी मुळचे आरपीआयचे असलेले आणि भाजपच्या चिन्हावर निवडुन आलेले परशुराम वाडेकर यांच्या नावावर मंगळवारी सकाळी शिक्कामोर्तब केले. त्यानंतर नागपुरे यांनी महापौर पदासाठीचा तर उपमहापौरपदासाठी वाडेकर यांनी उमेदवारी अर्ज नगरसचिव योगिता भोसले यांच्याकडे दाखल केला. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, गटनेते गणेश बिडकर, माजी सभागृहनेते आणि नगरसेवक श्रीनाथ भिमाले यांच्यासह पदाधिकारी आणि नगरसेवक उपस्थित होते.

**सिंहगड रोडला प्रथमच महापौरपदाचा मान मिळणार**

महापौर, उपमहापौर पदाची निवडणूक ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी जितेंद्र डुडी यांच्या उपस्थित होणार आहे. निवडणुकीच्या दिवशी पीठासीन अधिकारी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा कालावधी देतात. त्यानंतर अर्ज मागे न घेतल्यास निवडणूक प्रक्रिया राबवून सभागृहात मतदान होते. भाजपकडे स्पष्ट बहुमत आहे.त्यामुळे नागपुरे आणि वाडेकर यांचा विजय निश्चित आहे. त्यांच्या निवडीच्या घोषणा झाल्यानंतर सिंहगड रोड परिसराला प्रथमच महापौरपदाचा मान मिळणार आहे. नागपुरे या सलग तिसऱ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आल्या आहेत. यंदाच्या महापालिका निवडणुकीत त्यांनी प्रभाग क्रमांक ३४ मधून बिनविरोध विजयी झाल्या आहेत. मंजूषा नागपुरे या भाजपच्या निष्ठावंत नगरसेविका म्हणून ओळखल्या जातात. महापालिकेच्या कामाच त्यांचा चांगला अनुभव आहे. स्थायी समितीसारख्या महत्त्वाच्या समितीवर त्यांनी काम केलेले आहे. उपमहापौरपदासाठी भाजपकडून परशुराम वाडेकर यांनी अर्ज भरला आहे.

> “ महापौर पद हे केवळ उपभोगण्यासाठी नव्हे तर पुणेकरांची सेवा करण्यासाठी मिळालेली संधी आहे. त्यामुळे पुणेकरांना हेवा वाटेल त्याप्रमाणे काम करणार आहे. भाजपच्या सर्व नेत्यांनी विश्वास ठेवून महापौर पदाची मोठी संधी दिली आहे. अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची खूप इच्छा होती. परंतु ते आपल्यामध्ये आज नाहीत, याची मोठी उणीव जाणवत आहे.
>
> **- मंजुषा नागपुरे, महापौर पदाच्या उमेदवार, भाजप.**

### पत्नीपाठोपाठ पती उपमहापौर होणार

» भाजपने उपमहापौरपदासाठी परशुराम वाडेकर यांना संधी दिली आहे. त्यांची निवड निश्चित होणार आहे. गेल्या टर्ममध्ये परशुराम वाडेकर यांच्या पत्नी सुनिता वाडेकर या उपमहापौर होत्या. आता परशुराम वाडेकर हे उपमहापौर होणार आहेत. त्यामुळे पत्नी पाठोपाठ पती उपमहापौर होणार आहे.

### वर्षा तापकीर यांच्यावर अन्याय

» भाजपच्या नगरसेविका वर्षा तापकीर या २००७, २०१२, २०१७ आणि आता निवडून आल्या आहेत. त्या सलग चौथ्यांदा सभागृहात आल्या आहेत. २०१७ मध्ये पुणे महापालिकेत भाजपची सत्ता असताना वर्षा तापकीर यांना कुठल्याही पदावर संधी देण्यात आली नव्हती. त्यामुळे आता वर्षा तापकीर यांना संधी मिळण्याची दाट शक्यता होती. पण या वेळेसही वर्षा तापकीर यांना डावलण्यात आले आहे. वर्षा तापकीर या सातत्याने राष्ट्रवादीचा बालेकिल्ला राहिलेल्या भागातुन निवडून आल्या आहेत.

---

# हवेली तालुक्यात 3,064 दुबार मतदार; निवडणूक यंत्रणा अलर्ट

## जिल्हा परिषद–पंचायत समिती निवडणुकीपूर्वी प्रशासनाचा कडक इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

हवेली तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या तोंडावर दुबार मतदारांचा मुद्दा चांगलाच तापला आहे. तालुक्यात तब्बल 3 हजार 64 दुबार मतदार असल्याची आकडेवारी समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक यंत्रणा अलर्ट झाली आहे.



या दुबार मतदारांत 1 हजार 734 पुरुष, तर 1 हजार 330 महिला मतदारांचा समावेश आहे. दोन ठिकाणी मतदान करणे हा केवळ गैरप्रकार नसून तो गंभीर फौजदारी गुन्हा असल्याचे स्पष्ट करत निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंत माने यांनी अशा मतदारांना कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

नुकत्याच पार पडलेल्या पुणे महानगरपालिका निवडणुकीत मतदान केलेल्या काही मतदारांची नावे आता जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या यादीतही असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. एकाच व्यक्तीने दोन्ही ठिकाणी मतदान केल्यास लोकशाहीच्या नियमांचे उल्लंघन होते. अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर प्रशासन अधिक सतर्क झाले असून, तालुक्यातील 263 मतदान केंद्रांवर विशेष देखरेख ठेवली जाणार आहे.

दुबार नावे असलेल्या मतदारांना प्रशासनाने एक संधी दिली आहे. संबंधित मतदारांनी आपल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडे संपर्क साधावा. परिशिष्ट-1 मध्ये लेखी माहिती देऊन आपण नेमके कोणत्या केंद्रावर मतदान करणार आहोत, हे स्पष्ट करावे लागणार आहे.

दरम्यान, हवेली तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक अत्यंत चुरशीची ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने घेतलेल्या या कठोर भूमिकेमुळे बोगस मतदानाला चाप बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

> “ मतदान प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष पार पाडण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. लोकशाहीचा आदर राखून दुबार मतदारांनी स्वतःहून आपली भूमिका स्पष्ट करावी, अन्यथा कायद्याच्या कचाट्यातून सुटका होणार नाही
>
> **- डॉ. यशवंत माने, निवडणूक निर्णय अधिकारी**

# पोलीस आयुक्तांकडून मद्यपींना 'दम'

## शिवाजीनगर मुख्यालयात एक हजार मद्यपी वाहन चालकांचे समुपदेशन

**पुणे | प्रतिनिधी**

मद्यप्राशन करुन वाहने चालविणारया मद्यपींना सोमवारी शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात समुपदेशासाठी बोलाविण्यात आले. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी खास शैलीत मद्यपी वाहनचालकांना इशारा दिला. 'पुन्हा मद्यप्राशन करुन वाहन चालविल्यास कडक कारवाई करण्यात येईल', असा दम त्यांनी मद्यपी वाहनचालकांना दिला.



शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात रस्ते सुरक्षा मोहिमेअंतर्गत समुपदेशन आणि मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबारित मद्य प्राशन करुन वाहन चालविल्याप्रकरणी कारवाई केलेले एक हजार वाहनचालक उपस्थित होते. यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी कारवाई केलेल्या वाहनचालकांशी संवाद साधला. अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त हिंमत जाधव याव वेळी उपस्थित होते.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, 'मद्यप्राशन करुन वाहने चालविल्यामुळे गंभीर स्वरुपाचे अपघात घडतात. दोष नसताना वाहनचालक आणि पादचाऱ्यांना त्रासाला सामोरे जावे लागते. मद्यपी वाहनचालकांच्या चुकांमुळे एखाद्याचे कुटुंब उद्वस्त होते. मद्यप्राशन करुन वाहने चालवू नयेत. वाहन चालविल्यास पोलिसांकडून कडक कारवाई करण्यात येईल. पुन्हा मद्यप्राशन करुन वाहने चालविण्याचे धारिष्ट्य कोणी करणार नाही, हे लक्षात ठेवावे. संकेतस्थळ, समाज माध्यमात मद्यपी वाहनचालकांची छायाचित्रे प्रसारित केली जातील. मित्र, कुटुंबीयांना ही छायाचित्रे पाठविली जातील. भर चौकात मद्यपी वाहनचालकांचा पोलिसांच्या शैलीत खास सत्कार करण्यात येईल, याची जाणीव ठेवावी.'

**दर आठवड्याला समुपदेशन शिबिर**

अशा प्रकारचे समुपदेशन शिबिर दर आठवड्याला घेण्यात येणार आहे. भरधाव वेगने वाहन चालविणे, एकाच दुचाकीवरुन तिघांचा प्रवास, विरुद्ध दिशेने वाहन चालविणे अशा प्रकारचा नियमभंग करणाऱ्यांचा परवाना जप्त केला जाणार आहे. प्रसंगी त्यांचे वाहनही जप्त केले जाईल. या शिबिरास उपस्थित राहणे बंधनकारक आहे. त्यानंतर त्यांचा परवाना दिला जाणार आहे.

### वर्षभरात सहा हजार मद्यपी वाहनचालकांवर कारवाई

» 'गेल्या वर्षी मद्यप्राशन करून वाहने चालविणाऱ्यांविरुद्ध सहा हजार जणांविरुद्ध कारवाई (ड्रंक अँड ड्राईव्ह) करण्यात आली. यापुढील काळात कारवाई तीव्र करण्यात येणार आहे', असा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला.

### समाजात संदेश देण्याचे काम करावे

» 'समुपदेशन शिबिरात सहभागी झालेल्या वाहन चालकांना शिक्षा देण्याचा उद्देश नाही. वाहतूक नियमांचे पालन न केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतात, याबाबतचा संदेश देण्याचे काम वाहन चालकांनी करावे. भारतात दरवर्षी साधारणपणे एक लाख ८० हजार नागरिकांचा अपघाती मृत्यू होतो. आकडेवारीचा विचार केल्यास दररोज ४०० नागरिक रस्ते अपघातात मृत्यूमुखी पडतात, याचा विचार करणे गरजेचे आहे', असे अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी नमूद केले.

> शहरातील गंभीर स्वरुपाचे अपघात कमी करण्याचा निर्धार पोलिसांनी केला आहे. शहरातील ३० टक्के गंभीर अपघात अवजड वाहनांमुळे होतात. शहराच्या मध्यभागात जड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. पुढील आठवड्यात अपघात करणारे अवजड वाहनचालक आणि वाहन मालकांचे समुपदेशन करण्यात येणार आहे.
>
> – अमितेश कुमार, पोलीस आयुक्त.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीकरिता 29 लाख 72 हजार मतदार

## येत्या 7 फेब्रुवारी रोजी मतदानाचा हक्क बजाविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे मतदारांना आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ करिता जिल्ह्यात ३ हजार ६०५ मतदान केंद्र असून याअंतर्गत पुरुष १५ लाख २२ हजार २५६, स्त्री १४ लाख ५० हजार १४ आणि इतर ९१ असे एकूण २९ लाख ७२ हजार ३५९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे, येत्या ७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानाकरिता जिल्ह्यातील अधिकाधिक मतदारांनी मतदान केंद्रावर जावून मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.




बारामती तालुक्यात २ लाख ६४ हजार ६४२, मावळ २ लाख ३१६, मुळशी १ लाख ७३ हजार ४०१, शिरुर ३ लाख १ हजार ७८६, हवेली २ लाख ५१ हजार ५३३, दौंड २ लाख ७३ हजार १००, इंदापूर ३ लाख २१ हजार २, पुरंदर १ लाख ८९ हजार ४०३, भोर १ लाख ५४ हजार ८१०, वेल्हे ५५ हजार २३०, आंबेगाव १ लाख ८४ हजार ५२, जुन्नर ३ लाख ७ हजार २६० आणि खेड तालुक्यात २ लाख ९५ हजार ८२४ असे एकूण २९ लाख ७२ हजार ३५९ मतदार आहेत.

बारामती तालुक्यात २९९, मावळ २४३, मुळशी २२७, शिरुर ३३७, हवेली २६३, दौंड ३१७, इंदापूर ४००, पुरंदर २३५, भोर २३७, वेल्हे १०५, आंबेगाव २३९, जुन्नर ३६६ आणि खेड ३३७ तालुक्यात असे एकूण ३ हजार ६०५ मतदान केंद्र आहेत. यामध्ये प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे १३ आदर्श व महिला मतदान केंद्र आहेत, अशी माहिती श्री. डुडी यांनी दिलीआहे.